**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागात आज मोसमी पावसाची दमदार हजेरी/ किनारपट्टीच्या भागात मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी / मुंबई- पुणे आणि मुंबई गोवा मार्गावर वाहतुकीला अडथळे

- आवश्यकता नसेल तर प्रवास करु नये असं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज पावसामुळे दिवसभरासाठी स्थगित

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्यावर रवाना

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात आज मोसमी पावसानं दमदार हजेरी लावली असून अनेक ठिकाणी जनजीवन प्रभावित झालं आहे.

राजधानी मुंबई आणि उपनगरातल्या स्थितीविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी अंकिता आपटे यांच्याकडून कडून…

- **- - होल्ड - कॅप्सूल -- -**

*(मुंबई शहर आणि उपनगर परिसरात गेले तीन दिवस पडणाऱ्या संततधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. सखल भागात पाणी साचलं असून अनेक घरं आणि दुकानांमधे पाणी शिरलं आहे. मुंबई महानगरपालिकेनं १९१६ हा मदत दूरध्वनी क्रमांक कार्यान्वित केला आहे. शहरातल्या शाळा महाविद्यालयांना सुट्टी दिली असून शासकीय कार्यालयांना अर्धा दिवस सुट्टी दिली आहे. खासगी आस्थापनांनी कर्मचाऱ्यांना घरुन काम करायला सांगावं असं शासनाने सांगितलं आहे. पश्चिम रेल्वेच्या वसई विरार आणि नालासोपारा स्थानकांवर पाणी साचल्यानं उपनगरी वाहतूक ठप्प झाली आहे. मुंबई ते पुणे रस्ता आणि रेल्वे वाहतूक अतिशय संथगतीनं होत आहे. घाटातल्या मिसिंग लिंकवर तसंच रेल्वे मार्गावर मंकी हिल इथं मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळून रस्ते आणि रुळांवर राडारोडा जमला आहे. मुंबई ते पुणे धावणाऱ्या अनेक गाड्या आज रद्द झाल्या असून लांबपल्ल्याच्या*

*अनेक गाड्यांचे मार्ग आणि वेळा बदलण्यात आल्या आहेत. जुना मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद केला असून या मार्गावरची एसटी गाड्यांची वाहतूक पुढची सूचना मिळेपर्यंत बंद राहील. मुंबई गोवा मार्गावरही ८ ठिकाणी दरडी कोसळल्यानं वाहतुकीचा खोळंबा झाला आहे.*

*शासन करत असलेल्या उपाययोजनांविषयी त्यांनी महिती दिली.*

***- - - होल्ड - बाईट- मुख्यमंत्री -- -***

*मानखुर्द इथं अर्धवट बांधलेली इमारत कोसळून त्याखाली ६ जणांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.*

*मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचे वारे या स्थितीत आवश्यकता नसेल तर प्रवास करु नये, घराबाहेर पडू नये असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे. आज दुपारी ३ वाजून ५६ मिनिटांनी समुद्राला उधाणाची भरती येणार असून सुमारे ४ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर जाऊ नये असा सल्ला त्यांनी दिला.*

राज्यात किनारपट्टीच्या सर्व जिल्ह्यांना तसंच पुणे घाटमाथा परिसराला हवामानविभागानं दोन दिवसांसाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. या पार्श्वभूमीवर या ठिकाणच्या शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी दिली आहे.

**<><><><><>**

राज्यात इतरत्रही पावसाने जोरदार हजेरी लावली. आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी तिथल्या बातम्या दिल्या आहेत.

**रत्नागिरी** जिल्ह्यात मुंबई- गोवा महामार्गावर कशेडीजवळ दरड कोसळल्यामुळे महामार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अडथळे दूर करून वाहतूक नियमित करण्याचं काम सुरू केलं आहे. कोसळलेला काही भाग जवळच्या घरांच्या परिसरात आल्यानं त्या परिसरातल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे. वरंधा घाटात दरड कोसळ्यानं रस्ता बंद झाला आहे. मंडणगड तालुक्यात म्हाप्रळ आंबेत पुलाजवळ महाड तालुक्यातले बार्जेस भरकटून  अडकल्या आहेत. पुलाला धोका असल्याने तात्पुरती मंडणगड -

म्हाप्रळ गोरेगाव - माणगाव वाहतूक बंद केली आहे.

**रायगड** जिल्ह्यात पेण -खोपोली मुख्य रस्त्यावर पाणी आल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. सुधागड तालुक्यात कानसळ इथे अंबा नदीजवळ अडकलेल्या १२ कामगारांना सुखरूप बाहेर काढलं आहे.

**पालघर** जिल्ह्यात संततधार पाऊस होत असून नद्या नाले दुथडी भरुन वाहत आहेत. पाणी साचल्यानं रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. काही ठिकाणी सखल भागातल्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**ठाणे** जिल्ह्यातही जोरदार पाऊस होत असून सखल भागात पाणी साचल्यानं वाहतूक प्रभावित झाली आहे.

**पुणे** जिल्ह्यात मावळ तालुक्यात पाटण इथे आज पहाटे एका घरावर दरड कोसळली. दुर्घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ पथकाने बचाव आणि मदतकार्य सुरू केलं. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून एकूण २३ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. तर आंबेठाण इथे दरड कोसळली असून एकूण ७५ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. आळंदी शहरात प्रवेश करणारे चारही पूल पाण्याखाली गेल्यामुळे सर्व वारकरी आणि भाविकांनी आळंदीत शहरात जाणं टाळावं, ज्यांनी प्रवास सुरू केला असेल त्यांनी सुरक्षित आसरा घ्यावा असं आवाहन श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीने केलं आहे.

**सांगली** जिल्ह्यात कृष्णा आणि वारणा नदी पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस होत असून नद्यांची पाणी पातळीत वाढ होत आहे. बहे, सांगली, म्हैशाळ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**नाशिक** शहर आणि जिल्ह्यात इतरत्र पावसाला सुरुवात झाली आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर जास्त आहे.पावसामुळे त्र्यंबकेश्वर इथं एक घर पडलं परंतु जीवितहानीचं वृत्तनाही. काही ठिकाणी विहिरी आणि पशुधनाचं नुकसान झालं.

**जालना** शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात मध्यम स्वरूपाचा पासून सुरु आहे.

**<><><><><>**

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात जोरदार पाऊस होत असला तरी मराठवाड्यात दमदार पावसाची अद्याप प्रतीक्षा आहे. बीड जिल्ह्यात तीव्र जलसंकट निर्माण झालं असून, शेतीची कामं पूर्णपणे ठप्प झाली आहेत. जिल्ह्यातल्या लहान-मोठ्या एकूण १७३ धरणांमध्ये सध्या केवळ १७ पूर्णांक २५ टक्के इतकाच मर्यादित उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. पावसाअभावी जिल्ह्यातल्या तब्बल ८१ लघु प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले असून, ७९

प्रकल्प मृत साठ्यात गेले आहेत. मुख्य जलस्त्रोत आटल्यामुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र टंचाई निर्माण झाली आहे.

<><><><><>

मुंबईत गेले ३-४ दिवस कोसळत असलेल्या पावसामुळे जीवितहानी आणि वित्तहानी झाल्याचा मुद्दा विरोधकांनी आज विधानसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच उपस्थित केला. मिसिंग लिंकमध्ये दरड कोसळणं, मानखुर्द इथं इमारत कोसळून ६ जणांचा मृत्यू, मॅनहोलमध्ये पडून गेलेले बळी, झाडं पडून झालेले मृत्यू इत्यादी मुद्द्यांवरून त्यांनी सरकारला घेरलं आणि या प्रकरणी जबाबदारी निश्चित करून सरकारनं याविषयी सभागृहात सविस्तर निवेदन करावं, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर, ही एक अभूतपूर्व नैसर्गिक परिस्थिती असून सर्व प्रशासन अलर्ट मोडवर आहे, यंत्रणा कुठेही कमी पडणार नाही आणि यासंदर्भात उद्या संपूर्ण निवेदन सभागृहात करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. मानखुर्दमध्ये कोसळलेली इमारत पूर्णपणे बेकायदा होती. ती इमारत ज्या झोपडीवर पडली, त्यातल्या लोकांचा मृत्यू झाला, अशी माहिती त्यांनी दिली. मुंबईत दरवर्षी पावसाळ्यात सरासरी ८०० झाडं पडतात, पण कालच्या एका दिवसात साडेतीनशे झाडं पडली, असं त्यांनी सांगितलं. आज दुपारनंतर ताशी ७० ते ९० किलोमीटर वेगानं वारे वाहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सावध राहावं, शक्यतो प्रवास टाळावा आणि विशेषतः युवांनी पर्यटनासाठी बाहेर पडू नये, असं आवाहन त्यांनी केलं. त्यानंतर पावसाची परिस्थिती पाहता सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित केल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

विधानपरिषदेतही विरोधकांनी मुंबईतल्या परिस्थितीवरून सरकारला लक्ष्य केलं. मानखुर्दमधली इमारत बेकायदा होती, तर कारवाई का केली नाही, असा सवाल त्यांनी विचारला. यावर, मुख्यमंत्री विधानसभेत उद्या निवेदन देतील, असा पुनरुच्चार मदत आणि पुनर्वसन मंत्री गिरीश महाजन यांनी केला. गेल्या ३-४ दिवसांत पावसाशी संबंधित घटनांमध्ये १३ बळी गेल्याचं ते म्हणाले आणि आज हवामान विभागानं दिलेला इशारा पाहता सभागृहाचं कामकाज स्थगित करायची विनंती सभापतींना केली. त्यानंतर सभापती राम शिंदे यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

<><><><><>

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नांदेड मुंबई आणि टनकपूर नांदेड या एक्सप्रेस गाड्यांचं उद्घाटन केलं. ओदिशात भुवनेश्वर इथं झालेल्या कार्यक्रमात त्यांनी दूरस्थ पद्धतीने या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. नांदेड मुंबई ही एक्सप्रेस गाडी वाशिमआणि हिंगोली मार्गे जाणार असून त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भाकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून सहा दिवसांच्या परदेश दौऱ्यावर रवाना झाले. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांच्या निमंत्रणावरून आपण इंडोनेशियाला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी प्रस्थानापूर्वी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. या भेटीमुळे सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या दौऱ्यात ते तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधणार असून प्रोबोवो यांच्यासोबत योग्यकार्ता इथल्या प्रंबनन मंदिर संकुलाला भेट देणार आहेत.

नंतर प्रधानमंत्री, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्या निमंत्रणावरून मेलबर्न इथे रवाना होतील. ऑस्ट्रेलियातही ते भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. यानंतर प्रधानमंत्री न्यूझीलंडला भेट देतील आणि आर्थिक आणि व्यापारी संबंधांवर न्यूझीलंडच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा करतील.

<><><><><>

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं नीट युजी २०२६ परीक्षेचं शुल्क परत घेण्यासाठी बँक खात्याची माहिती अद्ययावत करायला उद्यापर्यंत मुदतवाढ दिली आहे. आतापर्यंत ८ लाख २९ हजार ५१० विद्यार्थ्यांनी बँक खात्याची माहिती अद्ययावत केली आहे आणि त्यांना परीक्षा शुल्क परत द्यायला सुरुवात झाल्याची माहिती एनटीएनं दिली आहे. ३ मे २०२६ रोजी झालेली परीक्षा रद्द झाल्यानं हे परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांना परत दिलं जातंय.

//<><><><><>//